समिती मावळ
विभाग,
शिक्षण/वशी/ ६९५/२००
दिनांक २६/ ९ /२००५

दि.३/११/२००४

प्रति,
मा.शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे
शिक्षण विभाग (माध्य.)
पुणे.

विषय :— नवीन माध्यमिक शाळांना परवानगी बाबत.
मुद्दे निहाय माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ :— आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य./नमाशा/०३—०४ पुणे
दि. २६/१०/२००४

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्री. पार्श्वप्रज्ञालय जैन श्वेतांबर तीर्थ पेढी संचलित श्री. पार्श्वप्रज्ञालय ज्ञान संस्कार मंदिर तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे या शाळेस भेट देवून खालीलप्रमाणे अहवाल पाठवित आहोत.

१. सदर माध्यमिक शाळा शासनाच्या वेळोवेळी निघणा—या आदेशांचे (उदा. विदयार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्य.शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ चे) काटेकोरपणे पालन करते.
२. सदर संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीकृत आहे. सोबत प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सादर करीत आहे.
३. सदर संस्थेची रूपी को.ऑप.बॅक तळेगाव दाभाडे या बॅकेत दि. ३/११/०४ अखेर रक्कम रू. ७,५०,१६०/— इतकी शिल्लक आहे. सोबत बॅकेचे बॅक बॅलन्स प्रमाणपत्र सादर करीत आहे.
४. सदर संस्थेविरूध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.
५. सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
६. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेणे बाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
७. सदर संस्थेमार्फत शाळा सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.
८. लेखापरिक्षण अहवाल — संस्थेच्या मागील तीन वर्षाच्या लेखापरिक्षण असल्याच्या सत्य प्रति सादर करीत आहे व सदर संस्था व शाळा दरवर्षी नियमित लेखापरिक्षण अहवाल सादर करीत असते.
९. संस्थेची घटना — सदर संस्थेच्या घटनेची सत्यप्रत सादर करीत आहे. सदर संस्था संस्थेच्या घटनेतील नियमावली प्रमाणे काम करीत असते.

१०. चलन – सदर संस्थेने माध्यमिक शाळेस परवानगी मिळावी म्हणून अर्जासोबत रू. ५०००/– चलन दि.३/५/२००० रोजी भरलेले आहे. सोबत चलनाची सत्यप्रत सादर करीत आहे.

११. फर्निचर – सदर संस्थेने चालविलेल्या माध्यमिक शाळेत खालील प्रकारचे फर्निचर पुरेसे उपलब्ध आहे. सोबत मुख्याध्यापकाचे पत्र सादर करीत आहे.

१. टेबल – १८ २. खुर्च्या– १५३ ३. कपाटे –१६
४. बॅचेस (बाके)– ८९ ५. स्टूल – १६ ६. रॅक – १४

१२. अ) हमीपत्र – रू. २०/– च्या स्टॅम्पपेपरवर (इंग्रजी माध्यमासाठी) सदर संस्था इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शाळेसाठी भविष्य काळात शासनापासून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या आर्थिक दृष्टया मागासलेल्या विदयार्थ्यांसाठी इ.बी.सी. च्या फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे हमीपत्र सोबत जोडलेले आहे.

ब) हमीपत्र – रू. २०/– च्या स्टॅम्पपेपरवर (कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमासाठी सदर संस्था सदर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक व माध्यमिक शाळा कायम विनाअनुदानित तत्वावर चालविण्यासाठी तयार आहे. भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या आर्थिक दृष्टया मागासलेल्या विदयार्थ्यांसाठी इ. बी.सी. च्या फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे हमीपत्र सोबत जोडलेले आहे.

१३. सदर संस्थेस शासनाची परवानगी मिळालेली आहे म्हणून २००४–०५ या शैक्षणिक वर्षापासून इ. ८वी चा वर्ग सुरू केलेला आहे. तसेच माध्यमिक शाळेस शासनाची परवानगी या ठिकाणी मिळाली असून त्याच ठिकाणी माध्यमिक शाळा सुरू केलेली आहे.

१४. याच ठिकाणी इ. ५वी ते ७ वी चे वर्गसुध्दा इ.८वी बरोबर सुरू करण्यात आलेले आहे. याची नोंद घ्यावी.

१५. शाळा परवानगीचे शासनाकडील पत्राची सत्यप्रत सादर केलेली आहे.

सदर शाळेस शासन मान्यता मिळणेस शिफारस असून पुढील कार्यवाही सादर.

Bgkad

बी.जी.कड
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती,मावळ
जिल्हा पुणे

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती मावळ
जि. पुणे